**नि.दि.दावा क्र. ३९४/२००६.**
(गोविंद देशपांडे विरुध्द तानाजी गोपाळा शिंदे म.वा. वगैरे)
**CNR No.MHST07-002506-2006.**

## नि.१०३ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी नं.२ ते ४ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्जातील कथने अशी आहेत की, वादी क्र.१ यांनी वाद मिळकतीचे प्रॉपर्टी कार्डास प्रतिवादीची असलेली नोंद पोकळ व बिनहक्काची असून त्या आधारे प्रतिवादींना कसलाही हक्क प्राप्त होत नाही याबाबत जाहीर ठराव होवून मिळण्याकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना वादी क्र.१ ने वादी क्र.२ ते ४ यांना वाद मिळकतीपैकी दक्षिणेकडील २४ आर क्षेत्र दिनांक २५/११/२०१३ ला नोंद खरेदीखताने विकले असून त्यांची नावे हक्कदार सदरी दाखल झालेली आहेत. वादी क्र.१ ने प्रस्तुत दावा दाखल केल्याची माहिती या वादींना झालेवर त्यांनी अर्ज करुन या दावेकामी स्वतःला वादी क्र.२ ते ४ म्हणून सामिल करुन घेतले. त्यामुळे त्यांना दाव्यात दुरुस्ती करणे भाग पडले आहे. त्याप्रमाणे वादी क्र. २ ते ४ हे दाव्यामध्ये दावा कलम १ नंतर १ब, दावा कलम ९ मध्ये दुरुस्ती करुन मागत आहेत. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी क्र.१अ ते १इ तर्फे निशाणी १०५ कडे अर्जास म्हणणे देवून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. प्रस्तुत वादी यांनी दाव्यात स्वतःला सामिल करुन घेतले ही बाब या प्रतिवादींनी मान्य केली आहे. परंतु त्यावेळी योग्य त्या तत्परतेने दुरुस्ती करुन मागितली नाही. या वादींना दाव्या बद्दलची माहिती दि.०३/०२/२०१७ रोजी समजली हे वादीचे कथन त्यांनी अमान्य केले आहे. प्रस्तावित दुरुस्ती सुमारे ६ वर्षांनी म्हणजे अत्यंत विलंबाने करुन मागितलेली आहे. वादी क्र. २ ते ४ हे प्रामाणिक खरेदीदार नाहीत. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होत आहे. सबब या सर्व कारणांसह अर्ज नामंजूर करण्याची या प्रतिवादींनी विनंती केली आहे.

०४.     उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

०५.     प्रस्तुतचा दावा वादी क्र.१ ने जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी सन २००६ मध्ये दाखल केला. दिनांक १७/०१/२००९ रोजी निशाणी ४८ कडे मुद्दे प्रस्तापित होवून दावा पुराव्यास लागलेवर वादी क्र.१ ने निशाणी ५४ कडे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले. दरम्यानचे कालावधीमध्ये वादी क्र.२ यांना दाव्यात सामिल करुन घेणेबाबत निशाणी ८४ कडे दिनांक २९/०४/२०१७ रोजी आदेश झाला व वादी क्र. ३ व ४ यांना सामिल करुन घेणेबाबत दिनांक ०४/०१/२०१८ रोजी निशाणी ८८ कडे आदेश झाला. तद्नंतर वादींनी दाव्यात दुरुस्ती केली. परंतु वादी क्र.३ व ४ यांना सामिल केलेबाबतची दुरुस्ती झालेवर आजपावेतो दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्याची तसदी घेतलेली नाही. दुरुस्ती झालेवर वादी क्र. १ च्या निशाणी ५४ कडील सरतपासावर प्रतिवादींतर्फे उलटतपास नाही असा आदेश दिनांक ०९/१०/२०१८ रोजी झाला व दावा वादींच्या पुढील पुराव्याकरीता नेमण्यात आला. परंतु दिनांक २२/०३/२०१९ पावेतो वादींनी अनेकवेळा संधी देवूनही दाव्याचेकामी कोणतीही तजवीज केली नाही म्हणून त्यांचा पुरावा बंद करण्यात येवून दावा प्रतिवादींचे पुराव्याकरीता नेमण्यात आला.

०६.     असे असताना या वादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन दाव्याचे कामी दुरुस्ती करुन मागितली आहे. वादींची कथने पाहता दिनांक २५/११/२०१३ रोजी त्यांनी वादी क्र.१ कडून वाद मिळकतीतील क्षेत्र खरेदी घेतले आहे. दाव्याची माहिती त्यांना दिनांक ०३/०२/२०१७ रोजी झाली असे त्यांचे कथन आहे. परंतु निशाणी ८४ व निशाणी ८८ कडील अर्जामध्ये असे कोणतेही कथन या वादीने केलेले नाही. तथापि दिनांक ०३/०२/२०१७ रोजी या वादींनी निशाणी ८४ कडे, त्यांना दाव्यात सामिल करुन घेणेबाबत जो अर्ज केला त्यामध्ये अथवा तो मंजूर झालेवर केलेल्या दुरुस्तीचे वेळी या वादींनी दाव्यामध्ये कोणतीही दुरुस्ती करुन मागितली नाही. तद्नंतरही वर नमूद केल्याप्रमाणे या वादी क्र. २ चे उपस्थित वादींचा पुरावा अनेक संधी देवून बंद करण्यात आलेला आहे. तोपर्यंतही या वादींनी कोणतीही दुरुस्तीबाबत तजवीज केली नाही. यावरुन प्रस्तुतचा अर्ज अत्यंत विलंबाने दाखल केलेला आहे ही बाब स्पष्ट होते.

०७.     या शिवाय प्रस्तुत अर्जातील कथने व प्रस्तावित दुरुस्ती पाहता त्यामध्ये नमूद केलेली कथने या वादींना नुकतीच न्यात झाल्याचे त्यांचे म्हणणे नाही. अर्जात कथन केलेल्या सर्वबाबी या वादींना दिनांक ०३/०२/२०१७ पासून ज्ञात होत्या परंतु त्यानंतर सुमारे २

वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता त्याबाबतची वस्तुस्थिती दाव्यामध्ये नमूद करण्याकरीता कोणतीही तजवीज या वादींनी केलेली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे गृहीतकाची बाध या अर्जास येते. प्रस्तुतकामी वादीचा पुरावा संपलेला आहे. दावा अत्यंत जुना असून वादीतर्फे चौकशीचे काम संपलेले असताना दिरंगाईने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज योग्य व न्यायोचित नाही. सबब वर नमूद कारणांचा विचार करता अर्ज नामंजर होणेस पात्र आहे. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

अर्ज (नि.१०४) नामंजूर करण्यात येत आहे.

ठिकाण :– कराड.
दिनांक :– २१/०९/२०१९.

(आरती कुलकर्णी)
६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर
कराड.